Registered No. B 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 6TH MAY 1897.

*☞ Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख २६ माहे मार्च सन १८९७ रोजीं मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे :—

### सन १८९७ चा आक्ट १३ वा.

**सन १८७९ चा हिंदुस्थानचा स्टांप आक्ट सुधारण्याबाबद आक्ट.**

ज्याअर्थीं सन १८७९ चा हिंदुस्थानचा स्टांप आक्ट सुधारणें योग्य आहे, त्याअर्थीं यावरून खालीलप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

सन १८७९ चा आक्ट १, कलम ७ अ, यानंतर नवीन कलम दाखल करणें.

१. सन १८९४ च्या ६ व्या आक्टाच्या २ ऱ्या कलमावरून सुधारलेला सन १८७९ चा हिंदुस्थानचा स्टांप आक्ट, कलम ७ अ, यानंतर खालील कलम जास्त दाखल केलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें :—

सन १८७९ च्या ११ व्या आक्टाअन्वयें पैका कर्जीं घेण्यासंबंधीं काढलेले बांड, डिबेंचर किंवा इतर दाखले.

"७ ब. (१) या आक्टांत कोणताही ठराव असला तथापि, सन १८७९ चा स्थानिक अधिकाऱ्यांनीं पैका कर्जीं काढण्याबाबदचा आक्ट, किंवा त्या त्या वेळीं अमलांत असणारा दुसरा कोणताही कायदा, याच्या ठरावांअन्वयें, बांड, डिबेंचर किंवा इतर दाखले यांच्याद्वारें, पैका कर्जीं काढणाऱ्या कोणत्याही स्थानिक अधिकाऱ्याला, त्यानें काढलेल्या बांडांच्या, डिबेंचरांच्या किंवा इतर दाखल्यांच्या एकंदर रकमेवर दर शेंकडा आठ आणे ड्यूटी अशा कर्जाच्या संबंधानें द्यावी लागेल, आणि अशा बांडांस, डिबेंचरांस किंवा इतर दाखल्यांस स्टांप लावण्याची जरूरी नसून त्यांवर, ते नवीन करते वेळीं, अनेकांऐवजीं एक सबंध करते वेळीं, एकाऐवजीं अनेक करते वेळीं, किंवा इतर प्रसंगीं कोणतीही जास्त ड्यूटी पडणार नाहीं.

"(२) ज्या ठरावांवरून पोटकलम (१) यांत कित्येक बांड, डिबेंचर किंवा इतर दाखले यांस, स्टांप लावण्याची व जास्त पडणाऱ्या कांहीं ड्यूटीची माफी दिली आहे ते ठराव, त्यांत सांगितल्या प्रकारचें जें कर्ज फेडल्यावांचून राहिलें असेल त्या सर्व कर्जाच्या बांडांस, डिबेंचरांस किंवा इतर दाखल्यांस लागू होतील, आणि असे सर्व बांड, डिबेंचर किंवा इतर दाखले, त्यांस स्टांप लावलेला असो किंवा नसो, कायदेशीर होतील.

" मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, ज्या स्थानिक अधिकाऱ्यानें असे बांड, डिबेंचर किंवा इतर दाखले काढले असतील त्याला, सन १८९७ च्या मार्च महिन्याच्या सव्विसाव्या तारखेपूर्वीं त्यांबाबद पडावयाची जी ड्यूटी ती अगोदर दिलेली नसेल किंवा या आक्टाअन्वयें काढलेल्या हुकुमानें माफ केलेली नसेल, तेव्हां ती यांतील कोणत्याही ठरावावरून माफ होईल असें समजूं नये. "

सन १८७९ चा आक्ट १, परिशिष्ट १, यांत नंबर ३९ ची सुधारणा करणें.

२. सदरहू आक्टाचें परिशिष्ट १, नंबर ३९, यांत पहिल्या कोष्टकांत "लीस" या सदरानंतर "पोटलीसासुद्धां" हा शब्द जास्त दाखल केला पाहिजे.

सन १८७९ चा आक्ट १, परिशिष्ट १, यांत नंबर ६० ची सुधारणा करणें व नंबर ६० अ हा नवीन दाखल करणें.

३. सदरहू आक्टाचें परिशिष्ट १, नंबर ६०, यांत सर्व ठिकाणीं "लीस" हा शब्द विभक्तिप्रत्ययांसह व त्यापूर्वींचा लगतचा "किंवा" हा शब्द हे यावरून रद्द केले आहेत ; आणि सदरहू नंबर ६० यानंतर खालील नंबर जास्त दाखल केला पाहिजे. तो येणेंप्रमाणें :—

| | |
|---|---|
| " ६० अ. लीसची ट्रान्सफर, असैन्मेंटाच्याद्वारें, पोटलीसच्याद्वारें नव्हे. | कन्व्हेयन्सला पडते तीच ड्यूटी (नंबर २१). |

जे. एम्. म्याक्फर्सन,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation.)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.